# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६


barti

जा. क्र/बार्टी पुणे/अधिछात्रवृत्ती/ २०२२-२३ | ८२८ दिनांक १६/२/२३

## जाहिरात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) योजनेचे तृतीय पक्ष मुल्यांकन (Third Party Evaluation) करून अधिछात्रवृत्ती योजनेची वास्तविकता, कार्यक्षमता आणि परिणाम कारकता वृद्धींगत करण्यासाठी सदरील जाहिरात देण्यात येत आहे. तरी तृतीय पक्ष मुल्यांकन कामाचा कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या विविध विद्यापीठ तसेच नामवंत अनुभवी संस्था यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**तृतीय पक्ष मुल्यांकन (Third Party Evaluation) निकष:**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजना BANRF वर्ष २०१३ ते २०२० पर्यत एकूण १४८४ विद्यार्थ्यांनी BANRF अधिछात्रवृत्तीचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीचे मुल्यमापन करणे.

२. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एम.फिल तसेच पीएच.डी या उच्च शिक्षणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF योजनेचे योगदान

३. सन २०१३ ते २०२० या कालावधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती BANRF योजने मुळे अनुसूचित जातीमधील एम.फिल तसेच पीएच.डी साठी विविध विद्यापीठे, संशोधन केंद्र यातील प्रवेशाचे प्रमाण

४. समता व सामाजिक न्याय या संकल्पनेला अनुसरून लाभार्थी विद्यार्थ्यांच्या संशोधन विषयांचे मुल्यांकन

५. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर लाभार्थी विद्यार्थ्यांच्या संशोधन विषयाला धरून केलेले सादरीकरण आणि त्याला मिळालेला प्रतिसाद व बहुमान याची तुलना

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती BANRF योजनेबाबत सामाजिक स्तरावर जनजागृती.

७. सामाजिक लेखापरीक्षणाचा कालावधी हा जास्तीत जास्त ३ महिने इतका असेल.

८. BANRF अधिछात्रवृत्ती अंतर्गत सामाजिक लेखापरिक्षणाबाबत आवश्यक बदल करण्याचा अधिकार मा. महासंचालक बार्टी यांनी रोखून ठेवला आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने जे विद्यापीठ तसेच नामांकित संस्था बार्टी मार्फत सुरु असलेल्या BANRF अधिछात्रवृत्ती या योजनेचे तृतीय पक्ष मूल्यमापन (Third Party Evaluation) करण्यास इच्छुक आहेत. त्यांनी सविस्तर प्रस्ताव आवश्यक खर्चासह दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ पर्यत बार्टी कार्यालयास सादर करावा.

(स्नेहल भोसले)
विभाग प्रमुख-योजना विभाग
बार्टी, पुणे

मा. महासंचालक बार्टी, पुणे यांच्या मान्यतेने